**प्रेसनोट दिनांक २६/०७/२०१९**

**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे शहर**

**विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १८३/२०१९ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ सह भादंवि कलम ३७०,३७० (अ) मधील सुटका केलेली ३ पिडीत महिला रा. थायलंड यांना त्यांचे मायदेशात जाणेसाठी मुंबई एअरपोर्ट येथुन विमानात बसवुन देवुन उत्कृष्ठ कामगिरी केले बाबत....**

विमानतळ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १८३/२०१९ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ सह भादंवि कलम ३७०,३७० (अ)मधील पिडीत महिला १.दुंगडाव सोमखी रा. थायलंड, २. नितीया सिमली रा. थायलंड, ३. डोकराक खेमने रा. थायलंड यांना गुन्हयातील आरोपी नामे-१)रंजनकुमार राजकिशोर पासस्वान वय २८ वर्षे धंदा स्पा मॅनेजर रा. एस स्काय हाईटस, बी /३०४, उंड्री पिसोळी ता. हवेली जि पुणे मुळगांव -मु.पो.तेलाड, तहसिल अगिया बाजार, जिल्हा भोजपुर बिहारट २) गौतम श्रीधर घाडगे वय ३३ वर्षे रा. खेडकर निवास सर्व्हे नं.४२/२ पठारे ठुबेनगर, खराडी पुणे मुळगांव मु पो. तेलकुडगांव ता. नेवासा जि. अहमदनगर यांनी प्राप्त करुन सदरचे महिलांना पैशाचे अमिष दाखवुन त्यांचेकडुन आपले टॅन्सी वेलनेस स्पा सेंटरमध्ये वेश्या व्यवसाय करुन घेतांना विमानतळ पोलीस ठाणे येथील पोलीसांनी केलेल्या छापा कारवाईमध्ये मिळुन आल्याने वरील नमुद आरोपींचे विरुध्द दिनांक १०/०४/२०१९ रोजी २३/५८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. वेश्या व्यवसायातुन सुटका केलेल्या वरील नमुद पिडीत महिलांना मे. कोर्टाचे आदेशान्वये संरक्षकामी रेस्क्यु फौंडेशन महमंदवाडी हडपसर पुणे येथे ठेवण्यात आलेले होते, सदरचे महिलांची गुन्हयाचे कामी ससुन हॉस्पीटल पुणे येथे वयाची व गायनिक तपासणी करण्यात आलेली आहे.

दाखल गुन्हयातील पिडीत ३ परदेशी महिला १ रा. थायलंड यांना त्यांचे मायदेशामध्ये पाठविणेकामी मा. न्यायालयाने अधिक्षका रेस्क्यु फौंडेशन महमंदवाडी हडपसर पुणे यांना आदेश दिलेले असल्याने तसे त्यांचे कार्यालयातुन ०६/०७/२०१९ रोजी विमानतळ पोलीस ठाणे येथे पत्र पाठविण्यात आलेले होते दिनांक ०८/०७/२०१९ रोजी विमानतळ पोलीस ठाणे येथील पोलीस नाईक १९५१ अविनाश संकपाळ, महिला पोलीस नाईक ६२५७ साधना पवार यांनी रेस्क्यु फौंडेशन महमंदवाडी हडपसर पुणे येथुन ३ पिडीत महिला रा. थायलंड यांना त्यांचे विमानाचे टिकीट,पासपोर्ट व इतर साहीत्यासह ताब्यात घेवुन प्रायव्हेट फोर व्हिलर वाहनाने सांताक्रुझ एअरपोट मुंबई येथे नेवुन तेथुन विमानाने त्यांचे मायदेशात थायलंड देशात पाठवुन देवुन उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

**(राजेंद्र पाटील)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**विमानतळ पोलीस स्टेशन पुणे.**